ईश्वर टी अ‍ॅण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी, पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३८० वा ● बुधवार, ता.१३ ऑगस्ट २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## मत चोरी आंदोलनादरम्यान काँग्रेस नेत्यांना अटक

**पणजी | रयत समाचार**

मंगळवारी काँग्रेसने राज्याच्या मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप केला. काँग्रेसचे म्हणणे आहे की, अनेक नोंदींमध्ये घर क्रमांक ० असा नमूद आहे आणि वेगवेगळ्या धर्म व जातींचे डझनभर मतदार एकाच पत्त्यावर नोंदवले गेले आहेत. गोवा प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष अमित पाटकर यांनी सांगितले की, दक्षिण गोव्यातील या तफावत बेंगळुरूमध्ये पक्षाचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांनी उघड केलेल्या प्रकरणासारख्याच आहेत. ''आम्हाला एका घर क्रमांकावर तब्बल ८० मतदार नोंदलेले आढळले आहेत. हा गंभीर प्रकार असून तो मतदार यादीतील अचूकता आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. आम्ही या प्रकरणाची चौकशी करत असून लवकरच हे उघड करणार आहोत,'' असे पाटकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. ही आरोपपत्रे देण्यासाठी काँग्रेसने आल्तिनो, पणजी येथील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडे मोर्चा काढला होता. हा मोर्चा, सोमवारी दिल्लीमध्ये अटक झालेल्या काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या खासदारांच्या समर्थनार्थ काढण्यात आला होता. मात्र, पोलीसांनी हा मोर्चा आझाद मैदानाजवळ थांबवला. सीईओ कार्यालयाकडे जात असताना पाटकर यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या प्रतिनिधी मंडळाला पोलीसांनी ताब्यात घेतले. या आंदोलनात, मतदार यादीच्या पुनरावलोकन प्रक्रियेत भाजपने पक्षपातीपणा केल्याचा आरोप करण्यात आला आणि या कथित फेरफाराला ''मत चोरी'' असे संबोधण्यात आले.

## राज्यात सणासुदीचे विशेष तपासणी अभियान

### अन्न व्यवसायिकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

**मुंबई | रयत समाचार**

राज्यातील नागरिकांना सकस व निर्भेळ अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनातर्फे ''सणासुदीचे विशेष तपासणी अभियान'' राबविण्यात येणार आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व राज्यमंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान पार पडणार आहे. या अभियानांतर्गत आज ता. १३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, नरीमन पॉईंट, मुंबई येथे अन्न व्यवसायिकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त (अन्न) मंगेश माने यांनी दिली. माने यांनी नागरिकांना आवाहन केले की, अन्नपदार्थांच्या गुणवत्ता व दर्जेबाबत तक्रारी असल्यास टोल-फ्री क्रमांक १८००-२२२-३६५ वर संपर्क साधावा. या अभियानाद्वारे अन्नपदार्थांची सुरक्षा, स्वच्छता आणि दर्जा राखण्यावर भर देण्यात येणार आहे.

FDA MAHARASHTRA
FOOD AND DRUG ADMINISTRATION

## पाथर्डीत १४ ऑगस्टला भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन

**पाथर्डी | रयत समाचार**

भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त गुरुवार, ता. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता पाथर्डी येथे भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेचे आयोजन सर्व राष्ट्रप्रेमी नागरिकांनी केले असून, सुरुवात सकाळी ८.०० वाजता वीर सावरकर मैदान, बाजारतळ, पाथर्डी येथून होणार आहे.


या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी, सामाजिक संस्था, समविचारी संस्था, महिला तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. तिरंगा पदयात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे राहील वीर सावरकर मैदान, नाईक चौक, आंबेडकर चौक, विजय हनुमान मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बोडखेबाबा चौक, नवोदय गल्ली, जय भवानी चौक, क्रांती चौक, अजंठा चौक येथे पदयात्रेचा समारोप होईल. या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी, नागरिक, युवक-युवती यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



## छत्रपती चौथे शिवाजी महाराजांचा इतिहास भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल-प्रा. राम शिंदे

**अहमदनगर/रयत समाचार**

भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या छत्रपती चौथे शिवाजी महाराजांचे स्मारक हे संघर्ष आणि स्वातंत्र्याचे प्रतिक आहे.येणा-या पिढीसाठी हे प्रेरणादायी स्थळ आहे. या ठिकाणी उभारण्यात आलेले प्रवेशद्वार केवळ एक भव्य वास्तू नसून, याठिकाणाला ऐतिहासिक स्वरूप यामुळे आले आहे. याठिकाणी मी निधी देऊ शकलो हे मी माझे भाग्य समजतो असे मत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी शहरातील छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारकस्थळी उभारण्यात आलेल्या मराठकालीन प्रवेशद्वाराचे लोकार्पण सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते करताना व्यक्त केले.यावेळी बाळासाहेब पवार, अमोल गाडे, डॉ.सागर बोरुडे, काकासाहेब तापकीर, सौ.नंदाताई पांडुळे, विजयसिंह होलम, स्मारक समितीचे यशवंत तोडमल आदींची प्रमुख उपस्थिती होती. आमदार स्थानिक विकास निधीतून, अहिल्यानगर शहरात उभारण्यात आलेल्या ''छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक प्रवेशद्वार'' चे लोकार्पण आज माझ्याच हस्ते होत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे सांगत प्रा. शिंदे म्हणाले, या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक समिती, स्मायलिंग अस्मिता कष्टकरी शेतकरी विद्यार्थी संघटनेमुळे मोठे ऐतिहासिक काम उभे केले आहे.परिसराच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाच्या माध्यमातून विद्यार्थी सहाय्यता केंद्र लोकार्पणाच्या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री आणावे ही यशवंत तोडमल यांची मागणी सभापती शिंदे यांनी मान्य केली. आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. परिसराच्या स्वच्छतेसाठी महानगरपालिकेने लक्ष देण्याची सुचनाही त्यांनी यावेळी केली.कार्यक्रमास समितीचे सदस्य, मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभापतींनी केली विविध विकास कामांची पहाणी व पुन्हा निधी देण्याची दिली ग्वाही छत्रपती चौथे शिवाजी महाराज स्मारक परिसरतील विविध विकास कामांची पहाणी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केली. या ठिकाणी उभे राहत असलेल्या विद्यार्थी सहाय्यता केंद्रात शेतकरी कुटुंबातील मुलींसाठी सबलीकरण कार्यक्रमात अत्याधुनिक मशिनरी देण्याचा शब्द स्मारक समितीला दिला.







## महाराष्ट्रात सिंगापूरची ३००० कोटींची गुंतवणूक

### ५००० रोजगार संधी निर्माण?

**मुंबई | रयत समाचार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सिंगापूरचे उपपंतप्रधान गन किम योंग आणि परिवहन मंत्री जेफरी सिओ यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन आणि मेपलट्री इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लि., सिंगापूर यांच्यात सामंजस्य करार (MoU) झाला. या कराराअंतर्गत मुंबई, पुणे, नागपूर आणि इतर औद्योगिक भागात लॉजिस्टिक्स व वेअरहाऊसिंग पार्क, औद्योगिक पार्क आणि डाटा सेंटर्स प्रकल्प उभारले जाणार आहेत. या माध्यमातून राज्यात ३००० कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन थेट ५००० रोजगार संधी निर्माण होणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील औद्योगिक पायाभूत सुविधा अधिक सक्षम होतील आणि जागतिक गुंतवणूकदारांसाठी राज्याचे आकर्षण वाढेल.

## छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून मार्गक्रमण करा- डॉ. कविता आल्मेडा

**मुंबई | गुरुदत्त वाकदेकर**

ज्ञानदीप मंडळ संचलित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, सत्पाळा येथे, आयक्यूएसी अंतर्गत मराठी विभाग आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी ता.११ ऑगस्ट रोजी ''किल्ल्यांची बाराखडी'' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. युनेस्को मान्यता प्राप्त १२ किल्ल्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा प्रमुख उद्देश या कार्यक्रमाचा होता. प्रसंगी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. कविता आल्मेडा यांनी उपस्थितांना प्रेरणादायी शब्दांत मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. आपण प्रत्येकाने त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून मार्गक्रमण करायला हवे. इतिहास विभाग प्रमुख डॉ. विन्सेंट डिमेलो यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा संपूर्ण इतिहास रसपूर्ण पद्धतीने, जिवंत चित्रणासह विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविला. यानंतर एस.वाय.बी.ए. वर्गातील शिव व्याख्याती साक्षी मोरे हिने पीपीटीच्या माध्यमातून युनेस्को मान्यता प्राप्त १२ किल्ल्यांचा परिचय उपस्थित शिवप्रेमी विद्यार्थ्यांना करून दिला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनेक किल्ल्यांबद्दल आपली उत्सुकता व्यक्त केली. सभागृहात इतिहासाविषयी अभिमान आणि प्रेरणेची भावना ओसंडून वाहत होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख जगदीश अनंत संसारे यांनी उत्साहपूर्ण शैलीत केले, तर मंथन कदम या विद्यार्थ्याने कृतज्ञतापूर्वक सर्वांचे आभार मानले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या इतिहासावरील प्रेमाला आणि शिवकालीन वारसा जपण्याच्या प्रेरणेला नवीन उभारी देणारा ठरला.







## एन.टी.व्ही न्यूज मराठीचा २३ वर्षांचा यशस्वी प्रवास

**अहमदनगर | रयत समाचार**

येथील बोरूडे बंधू यांच्या हॉटेल व्ही स्टार येथे एन.टी.व्ही न्यूज (N TV News) मराठी या वृत्तवाहिनीच्या २३ व्या वर्धापन दिन व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी संपादक इकबाल शेख यांच्यासह या यशस्वी प्रवासातील सर्व सहकारी, पत्रकार बंधू-भगिनींना सभापती राम शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून पदमश्री पोपट पवार, उपजिल्हाधिकारी गणेश राठोड, डिजिटल पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष राजा माने, अ‍ॅड. सुभाष काकडे, डी.डी. न्यूजचे विकास भोसले, कृ.उ.बा. समितीचे सभापती काकासाहेब तापकीर, युवा मोर्चाचे लहू शिंदे, संजय कोठारी, डॉ. भरत दारकुंडे, सतीश सावंत आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याचे सांगत, समाजातील घडामोडींचे सत्य स्वरूप जनतेसमोर मांडण्याच्या निष्ठावान कार्याचे कौतुक केले. एन.टी.व्ही न्यूज मराठीने गेल्या २३ वर्षांत निर्भीड, निष्पक्ष आणि रचनात्मक पत्रकारितेचा ठसा उमटवला असल्याचे विशेषत्वाने नमूद करण्यात आले. आजच्या डिजिटल युगातही प्रामाणिक बातमीदारपणा आणि जनहिताची भावना जपत सातत्याने कार्यरत राहिलेल्या एन.टी.व्ही न्यूज मराठीच्या कार्याची उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली.





शिवआर्मी शेतकरी संघटनेचे आंदोलन. गोऱ्हे घेऊन शेतकरी संगमनेर प्रांत कार्यालयात.

## राईट टू सेफ वॉक कायद्याची मागणी

**पुणे | रयत समाचार**

पायदळी चालणाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणी करत अ‍ॅड. निरज धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सारे भारतीय संघटनेने पुण्याचे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवित संरक्षण व व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार दिला असला तरी वाढत्या वाहनवाहतुकीमुळे पादचाऱ्यांचा सन्मानाने चालण्याचा अधिकार धोक्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. निवेदनात म्हटले की, वृद्ध, महिला, लहान मुले यांसह सर्व नागरिकांना रस्ता ओलांडताना सुरक्षिततेची हमी मिळावी. सध्या सिग्नलवर पादचाऱ्यांसाठी दिला जाणारा वेळ १५ सेकंदांपेक्षा कमी असून, तो किमान १ मिनिट असावा अशी मागणी करण्यात आली. तसेच पंजाब राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रात राईट टू सेफ वॉक कायदा करण्यात यावा, ज्यामुळे रस्ते अपघात कमी होतील आणि नागरिकांना चालताना सुरक्षिततेची जाणीव होईल, असे अ‍ॅड. धुमाळ यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा सन्मान राखण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी शासनस्तरावर योग्य निर्णय घ्यावा, अशी विनंती या निवेदनातून करण्यात आली.



## स्थानिक स्वराज संस्थांमधील फलक मराठीत लावा

### महाराष्ट्र एकीकरण समितीची मागणी

**बेळगाव | रयत समाचार**

बेळगाव भाषिक अल्पसंख्यांकांचे अधिकार पायदळी न तुडवता, कन्नडसक्ती मागे घेऊन बेळगाव शहरासह खानापूर, निपाणी आणि अथणी येथील स्थानिक स्वराज संस्थांमधील काढून टाकलेले कन्नड, मराठी आणि इंग्रजी भाषेत लिहिलेले नामफलक तात्काळ पूर्ववत बसवावेत, तसेच सरकारी परिपत्रके कन्नडसोबत मराठी भाषेत द्यावीत, अशा प्रमुख मागण्यांचे निवेदन मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीतर्फे सोमवारी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.अलीकडे सुरू असलेल्या कन्नडसक्तीला विरोध दर्शविण्यासाठी समितीतर्फे सोमवारी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र पोलिस प्रशासनाने मोर्चाला परवानगी नाकारत, त्याऐवजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याचा सल्ला दिला. त्यानुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात मोठ्या संख्येने जमलेल्या मराठी भाषिकांनी मध्यवर्तीचे कार्याध्यक्ष आणि माजी आमदार मनोहर किणेकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांना निवेदन सादर केले. निवेदन सादर करण्यापूर्वी माजी आमदार किणेकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांची थोडक्यात माहिती दिली. जमिनीचे उतारे, रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, दाखले आणि सरकारी परिपत्रके कन्नडसोबत मराठीत उपलब्ध करून देणे, सरकारी योजनांची माहिती मराठीत देणे या मागण्यांचे फलक विशेष लक्षवेधी ठरले.

यावेळी घोषणाबाजीने परिसर दुमदुमून गेला. जिल्हाधिकाऱ्यांनी मागण्यांवर निश्चित कारवाईचे आश्वासन दिले. या वेळी जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांच्यासह बेळगाव शहर पोलीस आयुक्त भूषण गुलाबराव बोरसे उपस्थित होते.



# लोकशाहीची लक्तरे दिल्लीगेट वेशीवर

## एलईडी व्हॅनवर राहुल गांधींची पत्रकार परिषद प्रदर्शित




**अहमदनगर । रयत समाचार**

काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हा प्रमुख व माजी नगराध्यक्ष दीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शहरातील दिल्लीगेट चौकात एलईडी व्हॅनच्या माध्यमातून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाविरुद्ध घेतलेली पत्रकार परिषद सोमवारी सायंकाळी प्रदर्शित करण्यात आली. या वेळी नागरिकांची चांगली उपस्थिती होती. पत्रकार परिषदेत मतचोरी प्रकरणाचे धक्कादायक तपशील समोर आल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली. ''लोकशाहीची लक्तरे दिल्लीगेट वेशीवर टांगली गेली,'' अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार, ही पत्रकार परिषद जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभरातील प्रमुख चौकांमध्ये एलईडी स्क्रीनद्वारे दाखविण्याचे ठरवले होते. त्यानुसार दीप चव्हाण यांनी स्थानिक पातळीवर या कार्यक्रमाची व्यवस्था केली. पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी असा आरोप केला की, लोकसभेत अवघ्या २५ जागांच्या जास्तीच्या बहुमतावर सत्तेत आलेले मोदी सरकार हुकूमशाही पद्धतीने कारभार करत आहे. निवडणुकीत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सहकार्याने भाजपने मतदार याद्यांमध्ये फेरफार करून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सुमारे ३० हजार बोगस मते नोंदवली. त्यामुळे अनेक ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार अल्प फरकाने पराभूत झाले. अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघात मात्र जनतेच्या मोठ्या पाठिंब्यामुळे भाजप उमेदवाराचा पराभव झाला, असे त्यांनी सांगितले. दीप चव्हाण म्हणाले, ''विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना जिंकवण्यासाठी जंग जंग पछाडावे लागले. पुढील निवडणुकीत मतदार योग्य विचार करून जनाधार असलेला महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून देतील, यात शंका नाही.'' या कार्यक्रमाला प्रा. बापू चंदनशिवे, बाळासाहेब भंडारी, श्याम वाघस्कर, मयूर पाटोळे, रिजवान शेख, फिरोज शेख, नलिनी गायकवाड, मनोज गुंदेचा, शम्स खान, रजनी ताठे, चंद्रकांत उजागरे, मोहसीन शेख, गणेश भोसले, अल्तमेश जरीवाला, आनंद गारदे, अज्जू शेख, तारीक कुरेशी, अनिस चुडीवाला, फरीन शेख तसेच काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. हा उपक्रम काँग्रेसच्या 'लोकशाही बचाव मोहिमे'चा एक भाग म्हणून पार पडला.



# नोटरी असोसिएशन जिल्हाध्यक्षपदी ॲड.जहागीरदार

## इकरा एज्युकेशन सोसायटीतर्फे सन्मान

**अहमदनगर । आबीद खान**

महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी ॲड. हाफीज जहागीरदार यांची निवड झाली असून, त्यांच्या या निवडीबद्दल इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे उपाध्यक्ष इंजि. इकबाल सय्यद म्हणाले, ''ही निवड केवळ वैयक्तिक उपलब्धी नसून कार्यतत्परता, प्रामाणिकपणा आणि कायदा क्षेत्रातील योगदानाची पावती आहे. नोटरी पब्लिक म्हणून त्यांनी अनेक वर्षे प्रामाणिक, पारदर्शक व जनहिताचे कार्य केले आहे. कायदा हे केवळ पुस्तकांतील नियम नाहीत, तर न्यायाची भावना प्रत्यक्ष कृतीत उतरवणे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे.'' सत्कार सोहळ्याला इंजि. सय्यद इकबाल, आर्कि. विकार काजी, पत्रकार आबिद खान, ॲड. अरकान जहागीरदार आदी उपस्थित होते. आर्कि. विकार काजी म्हणाले, ''आपल्या यशामुळे समाजात विश्वास, शिस्त व न्यायाची भावना अधिक बळकट झाली आहे. आपल्या कार्यामुळे केवळ कायद्याचा आदर वाढत नाही, तर तरुण पिढीला प्रामाणिकपणा व जबाबदारीची प्रेरणाही मिळते.''

# प्रशासक राजमध्ये मनपा शहर स्वच्छतेचा बोजवारा



**अहमदनगर । रयत समाचार**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने शहरातील स्वच्छतेच्या बोजवाराबाबत मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले. ऐन सणासुदीत शहरात कचऱ्याचे ढिगारे पडून राहिल्याने नागरिक त्रस्त असल्याचा आरोप करण्यात आला. निवेदन देताना शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्यासमवेत निलेश मालपाणी, सुदाम भोसले, रोहन शेलार, अल्तमेश जरीवाला, प्रमोद आढाव, भीमराज कराळे, राम वाणी, उमेश भांबरकर, रियाज कुरेशी, परवेज शेख, प्रशांत दरेकर, समीर पठाण यांसह पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अहिल्यानगर महापालिकेला स्वच्छता अभियानात पाच कोटी रुपयांचे केंद्रस्तरीय बक्षीस मिळाले असले तरी प्रत्यक्षात शहरात अस्वच्छतेचे साम्राज्य आहे. दररोज सुमारे १५० टन कचरा उचलला जात असतानाही ठेकेदाराला १९० ते २०० टन कचऱ्याचे बिल अदा केल्याचा आरोप करण्यात आला. हा भ्रष्टाचार असून, याबाबत खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून राज्य सरकारकडे तक्रार दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला. पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया यांसारखे साथरोग पसरू नयेत, यासाठी स्वच्छता आवश्यक आहे. मात्र, कचरा संकलनात झालेल्या ढिलाईमुळे शहरातील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे पडले असून, त्यातून दुर्गंधी, घाणीबरोबरच मोकाट कुत्री व जनावरांचा त्रास वाढला आहे. अनेक भागांत कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडीच येत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. काही इच्छुक नगरसेवकांनी स्वखर्चाने कचरा गोळा करून तो बुरुडगाव येथील डेपोपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था केली असून, ही मनपा प्रशासनासाठी नामुष्कीची बाब असल्याचे कळमकर यांनी नमूद केले. स्वच्छता अभियानातून मिळालेल्या पाच कोटी रुपयांचा वापर नेमका कुठे झाला, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने द्यावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. यापूर्वी नगरसेवकांनी सभागृहात घनकचरा व्यवस्थापनातील भ्रष्टाचाराबाबत आवाज उठवला होता, तरी परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. प्रशासनाने तातडीने या गंभीर प्रश्नाची दखल घ्यावी, अन्यथा शहरातील कचरा थेट मनपा आवारात टाकून आंदोलन केले जाईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे देण्यात आला आहे.



# कंपनीच्या संरक्षणासाठी शिंदेसेनेचा पुढाकार

## उरलेले उद्योग देखील शहर सोडतील- अनिल शिंदे

**अहमदनगर । रयत समाचार**

एमआयडीसीतील एक्साइड इंडस्ट्रीज कंपनीच्या कच्च्या मालाच्या गाड्या अडवून दहशत माजविणाऱ्या गुंड प्रवृत्तीचा बंदोबस्त करण्यासाठी शिवसेनेने पुढाकार घेतला आहे. शिवसेनेच्या वतीने नुकतीच कंपनी प्रशासनाबरोबर बैठक घेऊन त्यांना संपूर्ण संरक्षण देण्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी नगर शहरातील उद्योग व कामगारांचे रोजगार वाचवण्यासाठी शिवसेना ठामपणे उद्योजकांच्या पाठीशी उभी राहणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीला एक्साइड इंडस्ट्रीज कंपनीचे विभाग प्रमुख संदीप मुनोत, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, दिलीप सातपुते, संभाजी कदम, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संतोष ग्यानाप्पा, सचिन शिंदे, रणजीत परदेशी, युवासेना जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, स्वराज्य कामगार संघटनेचे अध्यक्ष दत्ता तापकिरे, सहसेक्रेटरी सुनिल कदम, कामगार प्रतिनिधी अजिनाथ शिरसाट, प्रदीप दहातोंडे, वसीम शेख, दिपक परभाणे, अभिजीत सांबारे, संतोष शेवाळे, जितेंद्र तळेकर, शशिकांत संसारे, राम घुगे, नामदेव झेंडे आदी उपस्थित होते. एमआयडीसी परिसरातील एक्साइड कंपनीत नगर व आसपासच्या भागातील तब्बल ३,००० हून अधिक कामगार कार्यरत आहेत. कंपनीसाठी लागणारा कच्चा माल नाशिक, पुणे आदी ठिकाणांहून आणला जातो. अलीकडेच आकाश बबन दंडवते यांच्या टोळीने खंडणीच्या हेतूने बाहेरील कच्चा माल घेऊन येणाऱ्या गाड्यांना अडवून चालकांना शिवीगाळ व धमक्या दिल्या. यामुळे उद्योगात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनिल शिंदे म्हणाले की, खंडणीखोर वृत्तीमुळे अनेक उद्योजक नगर शहर सोडून गेले आहेत. ही प्रवृत्ती थांबवली नाही तर उरलेले उद्योग देखील शहर सोडतील, आणि हजारो युवक बेरोजगार होतील. शिवसेना उद्योग व रोजगार वाचवण्यासाठी रस्त्यावर उतरेल. आकाश दंडवते व त्याच्या टोळीचा बंदोबस्त करण्यासाठी आम्ही जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना भेटणार असल्याचे स्पष्ट केले. योगेश गलांडे म्हणाले की, आकाश दंडवतेवर खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यामुळे सुडबुध्दीने माझ्यावर खोटा गुन्हा दखल करण्यात आला. एका व्यक्तीला पुढे करून गुन्हा दाखल करण्यात आला असून, लवकरच उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन एमआयडीसीमधील खंडणीखोरांविरोधात ठोस कारवाईची मागणी केली जाणार असल्याचे ते म्हणाले.

# निजाम अहमदशहा समाधीस्थळी 'हर घर तिरंगा यात्रा' उत्साहात




**अहमदनगर । रयत समाचार**

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयांतर्गत येणाऱ्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, औरंगाबाद मंडळाचे अधीक्षक पुरातत्त्वज्ञ डॉ.शिवकुमार भगत यांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर उपमंडलातील ऐतिहासिक स्मारकावर हर घर तिरंगा यात्राचे आयोजन करण्यात आले. ही यात्रा ११ ऑगस्ट २०२५ रोजी निजाम अहमदशहा यांचे समाधी स्मारक येथे पार पडली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून इतिहास अभ्यासक भूषण देशमुख उपस्थित होते. दादासाहेब रूपवते विद्यालयाचे सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात दादासाहेब रूपवते हायस्कूलपासून करण्यात आली. बालिकाश्रम रोड, साताळकर हॉस्पिटल, बागरोजा हडको परिसर मार्गे रॅली अहमदशहा समाधी स्मारकावर पोहोचली. यात्रेदरम्यान ''हर घर तिरंगा'', ''भारत माता की जय'', ''वंदे मातरम'' अशा घोषणांनी वातावरण देशभक्तीमय झाले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व उपमंडळ कार्यालयातील संवर्धन सहाय्यक संतोष महाजन, शिवाजी गायकवाड, संदीप हापसे, सतीश भुसारी, करीम शेख आदी कर्मचारी उपस्थित होते. बहुजन शिक्षण संघाच्या दादासाहेब रूपवते विद्यालयाचे पर्यवेक्षक जयंत गायकवाड, महेंद्र कदम, संजीवन साळवे, अजय भिंगारदिवे, अनिता हंगेकर, सुनीता पटेकर, नितीन कसबेकर तसेच इयत्ता ५ वी ते १० वीचे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

# विखे अभियांत्रिकीचे प्रा. नवनाथ राऊत यांना पीएचडी



**अहमदनगर । विजय मते**

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक नवनाथ धनाजी राऊत यांना इंदोर येथील ओरिएंटल विद्यापीठाकडून "Characteristics Evaluation of Geopolymer Concrete by Using Fibers and Industrial Waste" या विषयावर सिव्हिल इंजिनिअरिंग या शाखेत विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी प्रदान करण्यात आली. या अभ्यासक्रमात त्यांना ओरिएंटल विद्यापीठ, इंदोरच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील डॉ. मनिष पाटकर यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. राऊत यांनी आपल्या संशोधनादरम्यान इंटरनॅशनल जर्नल्समध्ये तीन संशोधन लेख प्रसिद्ध केले असून, नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांच्या संशोधन विषयावर एक लेख प्रकाशित झाला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. संस्थेचे चेअरमन नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड यांनीही त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# आदिवासी संस्कृतीचे संवर्धन ही काळाची गरज- डॉ. पठारे

## सीएसआरडीमध्ये जागतिक आदिवासी दिवस उत्साहात साजरा

**अहमदनगर । रयत समाचार**

बीपीएचई सोसायटीच्या सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था आणि एससीएमआय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आदिवासी दिवसाच्या निमित्ताने सीएसआरडीमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वसुंधरेशी कटिबद्धता आणि आदिवासी पारंपरिक सांस्कृतिक संवर्धन ही या कार्यक्रमाची प्रमुख थीम होती. सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास एससीएमआयच्या समन्वयक वर्षा भिंगारदिवे, सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. प्रदीप जारे, आसावरी झपके, सॅम्युअल वाघमारे, सायली तोरणे यांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले कि, आदिवासी समाजाच्या हक्कांचे रक्षण आणि त्यांच्या पारंपरिक संस्कृतीच्या जतनासाठी समाज कार्यकर्त्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे. त्यांनी म्हटले, हा कार्यक्रम केवळ सांस्कृतिक सादरीकरणापुरता मर्यादित न राहता, आदिवासी समाजाचे अस्तित्व, अधिकार आणि निसर्गाशी असलेल्या नात्याच्या सखोल समजुतीसाठी प्रभावी व्यासपीठ ठरला पाहिजे. आजच्या बदलत्या सामाजिक संदर्भात आदिवासी समाजाच्या योगदानाची जाणीव करून देणे आणि त्यांच्या हक्कांसाठी जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. त्यांनी पृथ्वी आपली नाही, आपण पृथ्वीचे आहोत या विचारातून निसर्ग संवर्धन आणि आदिवासी जीवनशैलीतील शाश्वततेचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ. प्रदीप जारे यांनी आदिवासी सांस्कृतिक पार्श्वभूमी विषद करत अनेक पैलू व वैशिष्ट्ये सांगितली. आपण या विविधतेचा आदर व सन्मान केला पाहिजे असे त्यांनी नमूद केले. एससीएमआयच्या समन्वयक वर्षा भिंगारदिवे यांनी एससीएमआय संस्थेची उद्दिष्टे व समाजकार्यातील योगदान विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रोपांना पाणी देवून पर्यावरण संवर्धनाचा प्रतीकात्मक संदेश देण्यात आला. समाजकार्य शिक्षण घेणारे प्रेमकुमार व भागवत यांनी आदिवासी संस्कृतीचे विविध पैलू मांडले. अपेक्षा, भाबिका आणि कीर्ती यांनी सादर केलेल्या पोस्टरद्वारे आदिवासी समाजातील परंपरा, रूढी आणि सांस्कृतिक विविधतेचे दर्शन घडवले. जॅबनीस व अनिषा यांनी आसामच्या बोडो समाजाचा पारंपरिक पोशाख परिधान करून नृत्य सादर केले, तर हंसुला, विनय आणि आशा यांनी भावस्पर्शी गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी कोंड्याल आणि शिवानी शिंगवी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापक व विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक













सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# रोजगार निर्मितीसाठी शेवगावात मार्गदर्शन मेळावा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत स्वयंरोजगाराच्या विविध संधींची माहिती देण्यासाठी भारतीय जनता पार्टी, शेवगाव तालुक्याच्या वतीने स्वराज मंगल कार्यालय, शेवगाव येथे रोजगार मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. रविवारी (दि. १० ऑगस्ट) झालेल्या या मेळाव्यास तालुक्यातील तरुण, महिला व बचत गटांच्या प्रमुखांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



मेळाव्यादरम्यान भारतीय जनता पार्टीचे शेवगाव मंडलाध्यक्ष महेश फलके यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा देत सत्कार केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मोनिका राजळे होत्या. प्रमुख पाहुणे जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगरचे निरीक्षक ज्ञानेश्वर खेडकर यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाईन होत असून, अर्जांची छाननी जिल्हास्तरीय समितीमार्फत केली जाते. बँक कर्ज मंजुरीनंतर पात्र अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होते. प्रकल्प अहवाल तयार करण्याची सोयही संकेतस्थळावर उपलब्ध आहे. १८ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींना अर्थसहाय्य मिळते, तर अनुसूचित जाती-जमाती, महिला, अपंग व माजी सैनिकांसाठी वयोमर्यादेत पाच वर्षांची सूट आहे. प्रक्रिया व निर्मिती क्षेत्रातील उद्योगांसाठी ५० लाख, तर सेवा व कृषीपूरक उद्योगांसाठी १० लाख रुपयांपर्यंत प्रकल्प मर्यादा असून, प्रकल्प किंमतीच्या १५ ते ३५ टक्केपर्यंत अनुदान मिळते.

शहरी भागासाठी ७५ टक्के, ग्रामीण भागासाठी ६५ टक्के बँक कर्ज मिळते. आमदार मोनिका राजळे म्हणाल्या, ''ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगाराची माहिती व प्रोत्साहन देण्यासाठी असे मेळावे आवश्यक आहेत. व्यवसायात सातत्य, आधुनिक पद्धतींचा अवलंब व चिकाटी ही यशाची गुरुकिल्ली आहे.'' मेळाव्यास जेष्ठ नेते बापुसाहेब पाटेकर, भिमराज सागडे, मंडलाध्यक्ष महेश फलके, संजय टाकळकर, राहुल बंब, गणेश रांधवणे, बापु धनवडे, नगरसेवक सागर फडके, गणेश कोरडे, राजाभाऊ लड्डा, सतीश लांडे, गंगा खेडकर, उमेश भालसिंग, विद्या अधाट, मंदाकिनी मुरकुटे, आशा गरड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण देवढे यांनी केले.



# न्यू आर्ट्स महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त भव्य ग्रंथप्रदर्शन

**शेवगाव । नरहरी शहाणे**

न्यू आर्ट्स महाविद्यालय, शेवगाव येथील ग्रंथालय विभागात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा करण्यात आला. या औचित्याने भव्य ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांच्या हस्ते झाले.

यावेळी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य प्रा. डॉ. कुंदे, उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके व उपप्राचार्य भाऊसाहेब अडसरे यांच्या हस्ते करण्यात आले.भारतीय ग्रंथालय चळवळीचे प्रणेते व ग्रंथालय शास्त्राचे पितामह म्हणून ओळखले जाणारे डॉ. रंगनाथन यांनी देशातील सर्वसामान्यांना ज्ञानाची दारे विनामूल्य खुली करण्याचा विचार मांडला व त्यासाठी आयुष्य वाहिले. १९२८ साली त्यांनी मद्रास ग्रंथालय संघाची स्थापना केली व सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात आणला. त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना रावसाहेब, डिलिट, पद्मश्री आदी सन्मानांनी गौरविण्यात आले.ग्रंथप्रदर्शनात मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील कथा, कादंबऱ्या, नाटके, विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, विश्वकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश, शब्दकोश, वार्षिके, प्रवासवर्णने, आत्मचरित्रे आदी विविध प्रकारचे ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले. ''अशा उपक्रमामुळे वाचकांना ग्रंथालयातील पुस्तके ओळखता येतात व त्यांची मागणी वाढते,'' असे ग्रंथपाल मीनाक्षी चक्रे यांनी सांगितले. ''वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी ग्रंथालय उपयुक्त ठरते. या ग्रंथप्रदर्शनाचा उपक्रम स्तुत्य आहे,'' असे प्राचार्य प्रा. डॉ. कुंदे यांनी मत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. प्रदर्शनाला महाविद्यालयातील प्राध्यापक, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच ११वी-१२वीच्या विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल मीनाक्षी चक्रे, अयोध्या देवकर व नंदू बर्डे यांनी परिश्रम घेतले.




# विद्युत सहायकपदी निकिता निजवे
## गावकऱ्यांच्या वतीने सन्मान

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

गावातील संघर्षकन्या निकिता अनिता महादेव निजवे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीत (महावितरण) (विद्युत सहायक) या पदावर निवड होऊन ठाकूर निमगावचे नाव अभिमानाने उंचावले आहे. त्यांच्या या यशाबद्दल स्वामी विवेकानंद ग्रंथालय आणि संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने परंपरागत पद्धतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. निकिता यांच्या यशामागे वडील महादेव निजवे यांची इच्छाशक्ती आणि तिचे अथक प्रयत्न कारणीभूत आहेत. ''अंगाला हळद लावणे हे आईवडिलांचे कर्तव्य असते, तर अंगावर गुलाल घेणे ही आपली जबाबदारी असते,'' असे निकिता अभिमानाने सांगते. ही जबाबदारी पार पाडत तिने यश खेचून आणले. ग्रामीण भागातील मुलीने आयटीआयमध्ये प्रवेश घेऊन इलेक्ट्रिशियनचा कोर्स करणे आणि महावितरणसारख्या आव्हानात्मक क्षेत्रात नोकरी मिळवणे हा लोकसमज तिने खोडून काढला. महावितरणमध्ये निवड होण्यापूर्वी निकिताने महापारेषणची परीक्षा दिली होती, परंतु त्यात यश मिळाले नाही. तरीही हार न मानता तिने नव्या जोमाने अभ्यास करून नुकत्याच जाहीर झालेल्या महावितरणच्या निकालात यश मिळवले. या यशामुळे तिचे कुटुंब, नातेवाईक आणि संपूर्ण गाव आनंदित झाला. गावात वाजतगाजत मिरवणूक काढून तिचा सत्कार करण्यात आला. आपल्या यशात साथ देणाऱ्या माहेर आणि सासरच्या सर्वांचे निकिताने आभार मानले. तिचे पती आप्पासाहेब कोठुळे यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला. विवाहानंतरही जोडीदाराची योग्य साथ मिळाल्यास मुली स्वतःला सिद्ध करू शकतात, हे निकिताने दाखवून दिले. स्वामी विवेकानंद ग्रंथालयाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास गावातील सर्व ग्रामस्थ, ग्रंथालयाचे युवक मंडळी व मान्यवर उपस्थित होते. सर्वांनीच निकिता यांच्या कार्याची आणि संघर्षाची प्रशंसा करत, त्यांचे यश गावातील तरुण-तरुणींना प्रेरणादायी ठरेल, असे मत व्यक्त केले.

# सोनईतील सीसीटीव्ही निष्क्रिय; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**नेवासा । विजय खंडागळे**

तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास देशमाने यांच्या संकल्पनेतून, तसेच व्यापारी, ग्रामस्थ व कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून सोनई शहरात सुरक्षेच्या दृष्टीने बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे काही ठिकाणी निष्क्रिय झाल्याचे आढळून आले आहे. सोनई ही मोठी बाजारपेठ असून, बारा वाड्यांतून नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. लोकवर्गणीतून बसविण्यात आलेले हे कॅमेरे बंद पडल्याने गावातील चोरी, बेकायदा खनिज वाहतूक इत्यादी घटनांवर आळा घालण्याचे प्रयत्न कमकुवत झाले आहेत.

काही घटना घडल्यास आरोपींना पकडण्यात पोलिसांना अडचण येण्याची शक्यता असल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. ''सीसीटीव्ही नेमके कशासाठी?'' असा सवाल ग्रामस्थांमधून होत आहे. शनिशिंगणापूर, राहुरी व गावातील रस्त्यांवर अनेक छोटे-मोठे अपघात होत असून, काहींमध्ये मृत्यूही झाले आहेत. अशा घटनांच्या पार्श्वभूमीवर सीसीटीव्हीकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याची ग्रामस्थांची नाराजी आहे. बसस्थानकांवरही रात्री सावधगिरी बाळगावी लागत असून, पुण्यात घडलेली बसमधील घटना लक्षात घेता बसस्थानकांची सुरक्षा धोक्यात असल्याचे चित्र आहे. सोनई परिसरात अवैध पद्धतीने गौण खनिजाचे रात्रंदिवस डंपरमधून उत्खनन व वाहतूक सुरू आहे. सीसीटीव्ही बंद असल्याने वाहतूकदारांना याचा फायदा होत असून, लाखो रुपयांची बेकायदेशीर वाहतूक उघडपणे सुरू असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय वैरागर यांनी केला आहे. ग्रामस्थांनी पुढील घटनांचे धोके टाळण्यासाठी व नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करण्याची मागणी केली आहे.




# केवळ ग्रंथसंग्रह नव्हे तर ग्रंथ, वाचक आणि ग्रंथपाल यांचे एकत्रीकरण म्हणजे खरे ग्रंथालय- प्राचार्य डॉ. बबन चौरे

**पाथर्डी । रयत समाचार**

''केवळ ग्रंथांचा संग्रह म्हणजे ग्रंथालय नसून, ग्रंथ, वाचक आणि ग्रंथपाल या तीन घटकांचे एकत्रीकरण म्हणजेच खरे ग्रंथालय होय. ज्ञान मिळवण्याचा सर्वात मोठा आणि उत्तम मार्ग म्हणजे ग्रंथालय असून, समृद्ध ग्रंथालये ही समाजाच्या वैचारिक वैभवाची साक्ष असतात,'' असे प्रतिपादन बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी केले. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बाबुजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड, डॉ. अरुण राख, प्रा. आनंद घोंगडे, प्रा. शरद बोडखे, प्रा. विनोदकुमार चेमटे, प्रा. संदीप कराड, प्रा. दादासाहेब बडे व अभिजीत आव्हाड उपस्थित होते.

डॉ. चौरे पुढे म्हणाले की, भारतात ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या प्रगतीत पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे योगदान मोलाचे आहे. ग्रंथालयशास्त्राची शास्त्रशुद्ध संकल्पना भारतात रुजवून तिला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले. ग्रंथालय हे व्यवस्थापनशास्त्र असून, त्याकडे समाजाभिमुख दृष्टीने पाहिले जावे, हा विचार सर्वप्रथम डॉ. रंगनाथन यांनी मांडला. ''ग्रंथालय हे गरीब विद्यार्थ्यांसाठी वरदान आहे. महापुरुषांची चरित्रे व उपदेशात्मक कथा लोकांचे जीवन बदलतात, तर कविता आणि नाटके मानवी आनंद देतात. आज वाचनाची आवड कमी झाली नसून, त्याचे स्वरूप बदलले आहे. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती सहज उपलब्ध होते; मात्र ती विचार न करता आत्मसात करणे ही चूक आहे. कोणत्याही क्षेत्रातील संपूर्ण व सखोल माहिती ग्रंथांमधूनच मिळते, हे त्रिवार सत्य आहे,'' असेही ते म्हणाले. विद्यार्थी विकासात ग्रंथालयाची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगून, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात वाचकांना पुन्हा ग्रंथालयाकडे आकर्षित करण्यासाठी ग्रंथपालांनी जोमाने प्रयत्न करावेत, हेच डॉ. रंगनाथन यांचे खरे स्मरण ठरेल, असे डॉ. चौरे यांनी शेवटी नमूद केले. कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. मन्सूर शेख व ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता अकरावीतील नव्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील साहित्यसंपदा आणि कामकाजाची माहिती देण्यात आली.

# अनधिकृत फ्लेक्स बोर्डवर कारवाई करून नुकसानभरपाई द्या
## व्यापाऱ्यांची प्रशासनाकडे मागणी

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

शहरातील महात्मा गांधी चौक, मेन रोड व शिवाजी चौक येथे विविध कार्यक्रम, वाढदिवस व शुभेच्छा संदेशांसाठी लावण्यात येणाऱ्या मोठ्या फ्लेक्स बोर्डांमुळे परिसरातील व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. अतिक्रमण मोहिमेमुळे आधीच त्रस्त व विस्थापित झालेल्या या व्यापाऱ्यांनी, बेकायदा बोर्ड लावणाऱ्यांवर कारवाई करून नुकसानभरपाई देण्याची मागणी श्रीरामपूर नगरपालिका व श्रीरामपूर पोलिसांकडे केली आहे.

या संदर्भातील निवेदन अतिरिक्त पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन व नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नगरपालिका हद्दीत फ्लेक्स बोर्डांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हे बोर्ड मोठ्या आकाराचे असल्याने दुकानदारांच्या व्यावसायिक उपक्रमांवर परिणाम होऊन हजारो रुपयांचे नुकसान होत आहे. तसेच हे बोर्ड पालिकेची किंवा व्यापाऱ्यांची परवानगी न घेता लावले जात असून, कोणताही कर अदा केला जात नाही. यामुळे नगरपालिका व व्यापाऱ्यांचे दुहेरी नुकसान होत आहे. व्यापाऱ्यांनी या बोर्डांचे मालक, छपाई करणारे व लावणारे यांच्यावर कायदेशीर कारवाई करून नुकसानभरपाई मिळवून देण्याची मागणी केली आहे. तसेच विनापरवानगी बोर्ड लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचीही विनंती केली आहे. निवेदनाच्या प्रती अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, शहर पोलीस निरीक्षक नितीन देशमुख आणि पालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांना देण्यात आल्या. दरम्यान, निवेदनानंतर मेन रोडवरील काही फ्लेक्स बोर्ड काढण्यात आले असले तरी शिवाजी चौकातील बोर्ड अद्याप कायम आहेत. नगरपालिकेने या बोर्डसाठी कालमर्यादा निश्चित करून फक्त परवानाधारकांचेच बोर्ड लावण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी व्यापारी व नागरिकांनी केली आहे. विनापरवानगी लावलेले बोर्ड त्वरित हटवावेत, अशीही सर्वानुमते मागणी करण्यात आली.

# जोशीवस्तीला स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा
## ११ वर्ष संघर्षानंतर भालचंद्र सावंत यांच्या लढ्याला यश

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील मौजे लिपणगाव ग्रामपंचायतीचे विभाजन करून जोशीवस्ती येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याचा शासनाचा ऐतिहासिक निर्णय अखेर जाहीर झाला आहे.

हा निर्णय ३० जून २०२५ पासून लागू झाला असून, गावकऱ्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटून आणि जल्लोष करून हा आनंद साजरा केला. हा केवळ प्रशासकीय निर्णय नसून ११ वर्षांच्या अखंड संघर्षाचा विजय आहे. सन २०१४ मध्ये भालचंद्र दत्तात्रय सावंत यांनी ''जोशीवस्तीला महसुली गाव व स्वतंत्र ग्रामपंचायत मिळाली पाहिजे'' या मागणीसाठी लढ्याची ठिणगी पेटवली. त्या काळापासून असंख्य अडथळे, विरोधकांचे डावपेच, राजकीय दबाव आणि प्रशासकीय टाळाटाळ यांचा सामना करत सावंत यांनी हा लढा जिवंत ठेवला. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी शासनाने जोशीवस्तीला राज्यातील भटके-विमुक्त समाजाचे पहिले महसुली गाव म्हणून घोषित केले.

मात्र स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठीचा संघर्ष अधिक तीव्र झाला. ''गावाचा हक्क आम्ही लढून घेणार, कोणाच्याही भीतीने माघार घेणार नाही'' या जिद्दीने सावंत यांनी शासन, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि गटविकास अधिकारी या सर्व पातळ्यांवर सातत्याने पाठपुरावा केला. गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या प्रस्तावावरून व विभागीय आयुक्त कार्यालयाच्या शिफारशीसह महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ अंतर्गत अधिसूचना प्रसिद्ध केली. स्थायी समिती अस्तित्वात नसतानाही जिल्हा परिषदेच्या प्रशासकाशी व स्थानिक ग्रामसभांशी चर्चा करून हा निर्णय अमलात आणला गेला. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी स्वतंत्र ग्रामपंचायतीवर तात्काळ प्रशासक व ग्रामपंचायत सचिव नेमण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे गावाला विविध शासकीय योजनांचा थेट लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा मिळाल्यानंतर भालचंद्र सावंत म्हणाले, ''२०१४ मध्ये मी हा लढा सुरू केला तेव्हा अनेकांनी टिंगल केली, अडथळे आणले, खोटे आरोप लावले. पण मी समाजाच्या हक्कासाठी झगडलो आणि आज गावाला हक्काचा दर्जा मिळवून दिला. पुढे जोशीवस्तीला आशिया खंडातील सर्वाधिक स्मार्ट ग्रामपंचायत बनवणे हा माझा संकल्प आहे. गावाच्या विकासात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध संविधानिक मार्गाने लढा सुरू ठेवणार आहे.'' जोशीवस्तीला स्वतंत्र ग्रामपंचायतचा दर्जा मिळणे म्हणजे फक्त प्रशासकीय बदल नाही, तर दुर्लक्षित समाजाच्या उभारणीचा पहिला टप्पा आहे. शासनाचा हा निर्णय गावाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल आणि हा संघर्ष महाराष्ट्रातील इतर वंचित भागांसाठी प्रेरणादायी ठरेल.



# ध्वजसंहितेचे पालन करून घरोघरी तिरंगा फडकवावा

यावर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे. या हजारो, लाखो ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे. १३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी. घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी. तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान. १५ ऑगस्ट नंतर तिरंगा ध्वज व्यवस्थित घडी घालून सन्मानपूर्वक ठेवावा. ध्वज संहितेच्या नियमांचे पालन करून प्रत्येकाने आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा व घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करावा. जयहिंद ! जयभारत!!





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद



# सायबर सुरक्षा जनजागृतीत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

मालिनी किशोर संघवी कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इकॉनॉमिक्स (ऋतंभरा), विलेपार्ले पश्चिम येथे क्विक हिल आणि महाराष्ट्र सायबर सेल यांच्या संयुक्त सहयोगाने सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात पार पडले. सुमारे दोन तास चाललेल्या या सत्रात वालिया सी.एल. कॉलेज ऑफ कॉमर्स आणि वालिया एल.सी. कॉलेज ऑफ आर्ट्सच्या समर्पित सायबर वॉरियर्स सुमेरा शेख व क्लॅरिस डिसोझा यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल युगातील वाढत्या सायबर धोके, ऑनलाईन फसवणूक, डेटा प्रायव्हसी आणि फिशिंग यांसारख्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. फिशिंग टाळण्यासाठीचे उपाय, सुरक्षित संकेतशब्द निर्मिती, ऑनलाईन व्यवहारातील दक्षता, तसेच सायबर हायजिनबाबत संवादात्मक चर्चा आणि प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना सजग करण्यात आले. विद्यार्थिनींनी अशा सत्रांची गरज अधोरेखित करताना ''ऑनलाईन धोके टाळण्यासाठी सखोल माहिती मिळाली'' अशी प्रतिक्रिया दिली. शिक्षकांनीही अशा उपक्रमांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो असे मत व्यक्त केले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व पटवून सांगत अशा सत्रांचे शैक्षणिक संस्थांमध्ये सातत्याने आयोजन करण्याची गरज व्यक्त केली. सत्राचा समारोप करताना सुमेरा शेख यांनी ''सायबर सुरक्षा हे कौशल्य नसून आजच्या युगातील अत्यावश्यक गरज आहे,'' असे सांगितले. महाविद्यालयाने आगामी काळात अधिक व्यापक शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला असून, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षेबाबतची सजगता निश्चितच वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# अरुंद रस्त्यामुळे बेलापूर गाव बेरंग

## स्मार्ट बेलापूरसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज

**बेलापूर । शफीक बागवान**

गाव तसं चांगलं, पण अरुंद रस्त्यामुळे बेरंग बनलं असे म्हणण्याची वेळ बेलापूरमधील गावकऱ्यांवर आली आहे. स्मार्ट बेलापूर बनवण्यासाठी सर्वपक्षीय सामूहिक नेतृत्वाची गरज आहे. श्रीरामपूर तालुक्यात बेलापूर हे सर्व दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे असे मानले जाते. गावातील झेंडा चौकापासून बाजार वेस तसेच महाल झोन आणि येथून पुढे केशव गोविंद रस्ता असे सारेच रस्ते अतिशय अरुंद आहेत. झेंडा चौकापासून पुढे दिवसा आणि रात्री चार चाकी वाहन घेऊन जाणे म्हणजे तारेवरची कसरत असते. संपूर्ण गावभर रस्त्यावरच दुचाकी चार चाकी वाहने लावली जात असल्यामुळे रस्ते आपोआप अरुंद बनले आहेत.

यामुळे मात्र सर्वसामान्य ग्रामस्थांना तसेच पेठेत येणाऱ्या बाहेर गावच्या नागरिकांना नको त्या संकटाला वेळोवेळी सामोरे जावे लागते. गावातील सर्वच रस्त्यांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. जलजीवन योजनेमुळे हे रस्ते अजून अरुंद झाले आहेत. चार चाकी वाहन समोरून येत असले तर सायकलस्वारास खाली उतरून या वाहनास जाऊ द्यावे लागते, इतकी दुरावस्था गल्लीबोळात लावण्यात येणाऱ्या दुचाक्या तसेच काही चार चाकी वाहनांमुळे झाली आहे.

गावातील काही सामंजस्य ग्रामस्थांनी घरासमोर वाहने लावण्यासाठी जागा सोडली आहे. तर अनेकांनी रस्त्यापर्यंत घर आणि घरांच्या पायऱ्या बांधल्या तसेच पायऱ्यांपुढे आपापली वाहने उभी करत असल्यामुळे अनेकांना हा त्रास सहन करावा लागतो. स्मार्ट बेलापूरसाठी आणि अरुंद रस्ते अजून रुंदवण्यासाठी सामूहिक नेतृत्वाची गावात गरज असून तसे झाल्यास या बेलापूरच्या बेरंगाला रंग येईल, गावातील काही सुजाण ग्रामस्थांनी अशी सूचक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. बेलापूर हे गाव तसे खूप जुने आहे. बेलापूर गावाच्या बरोबरीने लोकसंख्या असलेल्या शेवगाव, नेवासा, अकोले येथे नगरपंचायती झाल्या. यामुळे तेथील गावांना मोठा विकास झाला. बेलापूर गावच्या नगरपंचायतीचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. राजकीय कुरघोडीत हा प्रश्न खितपत पडल्यामुळे गावाच्या विकासाला खिळ बसली आहे. बेलापूरगाव नगरपंचायत झाल्यास तेथील नागरिकांना महागाईचा सामना करावा लागेल, अशी काहींची भावना आहे. मात्र आज ना उद्या या बेलापूर गावची नगरपंचायत होणारच असेल तर आत्ताच नागरिकांच्या विविध कर आणि महागाई बाबतच्या समस्या त्यांच्या अंगवळणी पडतील, म्हणून बेलापूर येथे नगरपंचायत स्थापित करा, असे काही सुजाण नागरिक आपापले मत व्यक्त करीत आहेत.

# तालुका उपाध्यक्षपदी विशाल धनगर

**नेवासा । विजय खंडागळे**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या आदेशानुसार आणि भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी नेवासा दक्षिण विभाग मंडळ कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. सोनई मंडळाध्यक्ष संभाजी जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विशाल बापूराव धनगर रा. पानसवाडी यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. विशाल धनगर हे गेली पंधरा वर्षे भारतीय जनता पार्टीत सक्रिय असून, पानसवाडीतील बूथ पातळीवर काम करताना जनतेच्या सुखदुःखात सहभागी होत आहेत. तसेच शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. निवडीबद्दल भावना व्यक्त करताना ते म्हणाले, ''भाजपा हा देशातील सर्वात मोठा आणि सर्वश्रेष्ठ पक्ष आहे. नेवासा तालुक्यात संघटना मजबूत करून येणाऱ्या काळातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व इतर निवडणुका जिंकण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन अहोरात्र प्रयत्न करणार आहे.'' निवडीनिमित्त पंचगंगा उद्योग समूहाचे प्रभाकर शिंदे, आ. विठ्ठलराव लंघे, आ. शिवाजी कर्डिले, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, मंडळाध्यक्ष संभाजी जगताप, मनोज कोकाटे, दिलीप भालसिंग, वाघोली सरपंच उमेश भालसिंग, ऋषिकेश शेटे, प्रताप चिंधे, सचिन देसरडा, कुणाल बोरूडे, सचिन भांड, ललित मोटे, योगेश बानकर, अरुण चांदघोडे, रवींद्र शिंदे, नामदेव येळवंडे, अंबादास उंदरे, मनोज पारखे, आदिनाथ पटारे आदींनी अभिनंदन केले.



# राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप

**अहमदनगर । रयत समाचार**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हा रुग्णालयातील कंत्राटी अधिकारी व कर्मचारी ता.१९ ऑगस्ट पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. हे कर्मचारी शासन निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने व विविध मागण्यांनुसार आंदोलन करत आहेत. त्यांनी आपल्या मागण्यांसाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले की, कंत्राटी कर्मचाऱ्यांना १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार नियमित सेवेत समायोजित करण्यास विलंब झाला आहे. त्याचप्रमाणे, कर्मचारी कमी मानधनावर काम करत असून, त्यांना ग्रॅज्युटी, १०% मानधन व रॉयल्टी बोनस, तसेच अधिक संरक्षणासाठी सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात आली. तसेच, कर्मचारी संप्रदाय आरोग्य विभागाच्या मागण्या मान्य न झाल्यामुळे ता. १९ ऑगस्टपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू होईल, असे राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती महाराष्ट्र राज्याने जाहीर केले आहे. संपूर्ण जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचारी, तसेच रुग्णालयातील अधिकारी, यांच्यासह मागण्या मान्य न झाल्यास ते आंदोलनात सहभागी होणार आहेत.

# लोणी खुर्दला मारुतीराय मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**लोणी खुर्द । शफीक बागवान**

राहता तालुक्यातील लोणी खुर्द येथे गुरूवारी ता. १४ ऑगस्ट रोजी श्री दक्षिणमुखी मारुतीरायांची नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठा होत असून, त्यानिमित्ताने भव्य सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती लोणी खुर्द चे सरपंच जनार्दन घोगरे पाटील यांनी दिली. सोहळ्याचा शुभारंभ मंगळवार १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता श्री मारुती रायांची मूर्तीची भव्य मिरवणूक काढून होणार आहे.

बुधवारी १३ ऑगस्ट रोजी प्रांत पूजा, मंदिर वास्तू पूजा व धार्मिक विधी पार पडतील. मुख्य प्राणप्रतिष्ठा व स्थापना महोत्सव गुरुवारि १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता संपन्न होणार असून, यावेळी रामायणाचार्य, विदर्भरत्न ह.भ.प. रामराव महाराज ढोक (नागपूरकर) यांचे कीर्तन होणार आहे. मिरवणुकीत मारुती रायांची मूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा, भजनी मंडळांचा सहभाग असेल. प्राणप्रतिष्ठा दिनी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे.




लोणी खुर्द व पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला भगिनी, युवक व भाविकांनी या दिव्य सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही सरपंच जनार्दन घोगरे पाटील यांनी केले आहे.

# १५ ऑगस्टला 'संघर्षरत्न-समाजभूषण' पुरस्कार वितरण सोहळा

## ७५ मान्यवरांचा होणार सन्मान

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सामाजिक, अध्यात्मिक, राजकीय, पत्रकारिता, औद्योगिक, समाजकारण आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी संघर्षनामा प्रिंट अँड इलेक्ट्रॉनिक मीडिया, महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय ''संघर्षरत्नसमाजभूषण सोहळा २०२५'' उत्साहात पार पडणार आहे.

या सोहळ्यात संघर्षरत्न जीवनगौरव पुरस्कारासह विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असून, महाराष्ट्रातील प्रतिष्ठित ७५ मान्यवरांचा संघर्षरत्न समाजभूषण पुरस्काराने गौरव केला जाणार आहे. पत्रकारिता, सामाजिक कार्य, अध्यात्म, उद्योग अशा संघर्षसिद्ध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्यांचा या प्रसंगी विशेष सन्मान होईल.हा भव्य सोहळा शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता तुळशीदास मंगल कार्यालय, पेडगाव रोड, श्रीगोंदा, जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडणार आहे. यावेळी प्रा. राम शिंदे (विधान परिषद सभापती, महाराष्ट्र राज्य), सुदाम महाराज, गोरख गुरुजी, पद्मश्री पोपट पवार, खासदार निलेश लंके, बबनराव पाचपुते (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य), आमदार संग्राम जगताप, आमदार विक्रमसिंह पाचपुते, आमदार काशिनाथ दाते, बाबासाहेब भोस (माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद, अहिल्यानगर), शिवाजी ढवळे (म्हाडा नाशिक विभागाचे माजी अध्यक्ष), उद्योगभूषण विजया गरुडकर (जी के प्लास्टिक), वृद्धेश्वर मल्टीस्टेटचे चेअरमन विठ्ठलराव वाडगे आदी मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण होणार आहे..या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक संपादक मेजर भिमराव उल्हारे असून, निमंत्रक म्हणून माधव उल्हारे, मेजर निलकंठ उल्हारे व संतोष शिंदे कार्यरत आहेत. संघर्षनामा संयोजक मंडळाच्या वतीने सर्व पत्रकार बांधव, राजकीय व सामाजिक संघटना, मान्यवर आणि नागरिकांना या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




# महात्मा फुले कृषी विद्यापीठात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

**राहुरी । रयत समाचार**

तमिळनाडूतील शियाली येथे ९ ऑगस्ट १८९२ रोजी जन्मलेले डॉ. शियाली रामामृत रंगनाथन हे भारतातील ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून ओळखले जातात. सुरुवातीला गणिताचे प्राध्यापक असलेले रंगनाथन १९२४ साली मद्रास विद्यापीठात ग्रंथपाल म्हणून कार्यरत झाले आणि ग्रंथालय विज्ञान क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणले. त्यांचे तत्त्वज्ञान व कार्य आजही जगभरातील ग्रंथालय विज्ञान अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शक ठरत असल्याचे प्रतिपादन डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या विद्यापीठ ग्रंथालयात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे ग्रंथपाल व संख्या शास्त्र विभाग प्रमुख डॉ. एम.आर. पाटील होते. तसेच अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड व प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. एम.आर. पाटील यांनी सांगितले की, डॉ. रंगनाथन यांनी जगप्रसिद्ध ग्रंथालय शास्त्राचे पाच नियम मांडले तसेच कोलन वर्गीकरण पद्धती विकसित केली. त्यांनी ग्रंथालयावर अनेक महत्त्वपूर्ण पुस्तके लिहिली असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन १९५७ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा अधिकाधिक वापर करून आपले ज्ञानवर्धन करण्याचे आणि वाचनाची सवय जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून झाली. यावेळी विद्यापीठातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

